# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०९/०९/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### फार्म हाउसवर दरोडा टाकणारे आरोपी गजाआड

### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०५/०९/२०२४ रोजी फिर्यादी नामे– मधुकर गुलाबरावजी चौधरी वय ५६ वर्ष रा. मुर्ती ता. काटोल जि. नागपूर हा डॉ. आशिष चौधरी यांचे मौजा चिखलागड शिवारातील फार्महाउस येथे काम करीत असुन फिर्यादी हा फार्महाउसवरील रूमवर झोपला असता अज्ञात अंदाजे २५ ते ३० वयोगटातील अनोळखी ६ ईसमांनी फिर्यादीचे हातपाय वायरने बांधुन व तोंडाला टावेलने बांधले व जबरीने फिर्यादीचे अंगावरील पॅन्टच्या खिशातील नगदी ४,०००/– रूपये, टेक्नो कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये जिओ कंपनीचा ८९९९०६१३५० क्रमांकाचा सिमकार्ड असलेले फिर्यादीचे खिशातील फार्महाउसच्या चाब्या घेवुन फार्महाउस उघडुन त्यामध्ये सि.सि.टी.व्ही. कॅमेराच्या मशिन, बाथरूमधील २ गिझर, चहाचा थर्मास, करावके स्पीकर बॉक्स व ५ लिटर पेट्रोलने भरलेली डबकी असा एकुण ३०,२००/– रूपयाचा मुद्देमाल सोबत घेवुन गेले.

दिनांक ०९/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन काटोल अप. क्र. ७५०/२०२४ कलम ३१० (२) १२७ (२) BNS गुन्ह्याच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपी यांचा शोध घेत असता गोपनीय बातमीदारा कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रिक माहिती वरून आरोपी तुषार योगीराज नेवारे, रा. धर्ती ह. मु. नागपूर हा डॉक्टर चौधरी ह्याचे फार्म हाऊस वर अगोदर काम करीत होता. ह्यानेच त्याचे साथीदार नामे–२) ऋषभ इन्द्रराज सलामे वय २६ रा. हिवरा बाजार रामटेक ह. मु. नागपूर ३) उर्फ नाना बाबुराव भुजाडे वय ३० वर्ष, रा. भिवापूर ४) मृणाल महेंद्र शेगावकर वय २१ वर्ष, रा. भिवापूर ५) सागर सतीश बाहे वय २१ रा. कामठी ६) मोहित अरविंद ठाकरे वय ३५ वर्ष, रा. खरबी नागपूर ७) धनवान नत्थु दिरबुडे वय ४४ वर्ष, खरबी नागपूर ८) सतीश रमेश शेगावकर वय ३० रा. भिवापूर फरार आरोपी– ९) मनीष शाहू रा. कामठी १०) विजय लोचवाणी रा. रनाडा यांचेसह सदर गुन्हा केल्याची खात्री झाल्याने नागपूर येथून तुषार नेवारे यास ताब्यात घेवून सदर गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता सदरचा गुन्हा हा त्याने त्याचे साथीदार यांचे सह फार्म वर गुप्तधन आहे या लालसेने केल्याची कबुली देवुन गुन्ह्यात नागपूर येथील धनवान दीरबुडे यांचे Ashok Leyland कंपनीचा बडा दोस्त हे वाहन साथीदारांना ने आण करण्यासाठी व मुद्देमाल आणण्यासाठी वापरले व घटनास्थळारून आणलेला मुद्देमाल हा मोहित ठाकरे यांचे घरी ठेवल्याचे सांगितले. गुन्हयातील उर्वरित आरोपींचा शोध घेवुन भिवापूर, कामठी, नागपूर येथुन आरोपी क्र. २) ते ०८) यांना ताब्यात घेऊन गुन्ह्यातील मुद्देमाल १) २ havells कंपनीचे गीजर किंमती ५०००/– रू २) १ थर्मास किंमती १५००/– रू ३) bosch कंपनीचा टूलबॉक्स किट किंमती ३०००रू ४) remi storm कंपनीचे मिक्सर किंमती २०००रू ५) काळया रंगाचे केबल किंमती ५००रू ६) पिवळया धातूचे लहान गंज किंमती २००रू ७) १ सोलर झटका मशीन किंमती ३०००रू ८) म्युझिक सिस्टम किंमती ३०००रू ९) ashok leyland कंपनीचा बडा दोस्त वाहन क्र. MH 40 CT 0026 रू. असा एकूण ७,१८,२००रू चा मुद्देमाल मोहीत ठाकरे यांचे घरुन जप्त करण्यात आला. यातील नमूद आरोपीतांची

मेडिकल तपासणी करून गुन्ह्यातील जप्त मुद्देमालासह पो.स्टे. काटोल यांचे ताब्यात पुढील कार्यवाही कामी देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापु रोहोम, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, आशीष सिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक बटटुलाल पांडे, सफौ विनोद काळे, मिलींद नांदुरकर, पोहवा इकबाल शेख, संजय बांते, दिनेश अधापुरे, पोहवा प्रमोद भोयर, रोशन काळे, राजू रेवतकर, नापोशि संजय बरोदीया, पोअं. अभिषेक देशमुख देवकते, विरेंद्र नरड, चालक अमोल कुथे आशिष लांजेवार, सुमित बांगडे, मुकेश शुक्ला सायबर सेलचे सतीश राठोड यांनी पार पाडली.




## कन्हान येथील सराईत गुन्हेगार अभिषेक उर्फ चिंटू अजित सिंग (राजपूत) याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबद्ध

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत गुन्हेगार अभिषेक उर्फ चिंटू अजित सिंग (राजपूत) वय २६ वर्ष राहणार खदान नंबर ०६ कन्हान त्याच्या विरुद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे साथीदारांसह जबरी चोरी, घरफोडी, कोळसा चोरी, लोखंड चोरी, अग्निशस्त्र बाळगणे, दुखापत, जातीवाचक शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी देणे यासारखे गुन्हे दाखल असुन त्याचेवर वेळोवळी प्रतिबंधक कारवाई करून सुद्धा तो कायदयाला जुमानत नसल्याने त्याचेवर MPDA अन्वये कारवाई करण्यात आली असता माननीय जिल्हा दंडाधिकारी साहेब नागपूर यांनी स्थानबद्धता आदेश पारित केल्याने त्याला दि. ०९/०९/२०२४ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे स्थानबद्ध करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान डॉ. संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोहवा निलेश बर्वे, पोस्टे कन्हान येथील Pi राजेंद्र पाटील, Api चव्हाण, हरीश सोनभद्रे, पोना अमोल नागरे, आकाश शिरसाट, अश्विन गजभिये, dhc बंटी गेडाम यांनी पार पाडली.

# पोलीस ठाणे बुट्टीबोरी अंतर्गत घेण्यात आली मॉक ड्रील

पोलीस ठाणे बुट्टीबोरी अंतर्गत आज दिनांक ०९/०९/२४ रोजी मा. श्री दिपक अग्रवाल उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी सण गणपती उत्सव, ईद ऐ मिलाद सणाचे अनुषंगाने दंगा काबू व रंगीत तालीम १६/४५ वा. ते १७/१५ वा. घेण्यात आला. सदर रंगीत तालीममध्ये श्री. प्रतापराव भोसले पोलीस निरीक्षक व ०३ अधिकारी, १० पोलीस अंमलदार, आरसीपी पथक ०१, होमगार्ड सैनिक १० हजर होते.






पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर